ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-III March 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भारतीय स्वातंत्र्य आणि क्रांतीसींह नाना पाटील

**डॉ.युवराज दीक्षित**
कर्मवीर हिरे महाविद्यालय ,गारगोटी
मो. ९१५६११७१११
Email :dr.yuarajdixit@gmail.com

## प्रास्ताविक ः

१९४२ च्या ऑगस्ट महिन्यात मुंबईच्या गोवालिया टॅकवर अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या ओधवेशनात म.गांधी यांनी ब्रिटिशांना छोडो भारत चा इशारा दिला. या इशा-याने देशभर आंदोलन सूरू झाले. आंदोलनाला मिळालेल्या उत्सफुर्त प्रतिसादामुळे परकीय राज्यकर्त्याचे आसन डळमळीत झाले. इंग्रज सरकारने हे आंदोलन विविध मार्गानि दडपण्याचा प्रयत्न केला. सरकारी दडपशीखाली सर्वसामान्य जनता भरडली जाऊ लागली.अल्पावधीतच या आंदोलनाचा जोमही ओसरू लागला. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या सातारा जिल्हयातील कॉंग्रेसचे एक नेते नाना पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांची गुप्त बैठक घेऊन या तरूणांना मार्गदर्शन व चेतावनी देऊन देशभक्ती व देशाभिमान जागृत केला.

आता काय वाटेल ते होवो प्रसंगी प्राण गमवावे लागले तरी चालेल, तरी बेहतर पण कोणत्याही परिस्थितीत इंग्रज सरकारला शरण म्हणुन यायचे नाही.! असा तरूणांना आदेश देऊन प्रतिसकारची स्थापना केली. त्यांच्या कार्याचा परिचय या शोध निबंधात घेतला आहे.

## बाळपण व शिक्षण ः

३ ऑगस्ट १९०० रोजी बहे.बोरगांव या सांगली जिल्हयातील अजोळच्या गावात जन्म झाला. जुन्या साता-या जिल्हयातील मेडे मच्छिंद्र हे त्याचे मुळ गाव होय. या गावाला नाथपंथीय ,आदीनाथ ,मच्छिंद्रनाथ यांचे हे स्थान मानले जाते. नाना पाटलांचे सामान्य मराठा कुटुंबात बाळपण गेले पण पणजोबा व आजोबा माळकरी होते. नानाच्या गळयात बाराव्या दिवशी म्हणजे बारश्यात विठ्ठलाची माळ घातली गेली. त्याचे बाळपण मजेत व स्वच्छंदी गेले त्यांना सदृढ प्रकृती लाभल्याने तालीम व व्यायामाचा छंद बालपणापासुनच लागला. वयाच्या सातव्या वर्षी त्याला शाळेत घातले शाळेतही त्यांनी चांगली गती घेतली. तिसरीपर्यंतचे शिक्षण गावी झाल्यानंतर इस्लामपूर येथे शिक्षणासाठी गेले. भैरोबा खोतांच्या घरी

चार वर्ष रामपूरी बुवाच्या मदतीने मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. १९१८ मध्ये व्हर्नाक्युलर फायनलची मराठी सातवीची परिक्षा उतीर्ण झाले.

## सरकारी नोकरी :

१९२० मध्ये कराड तालुक्यातील सुरली सज्जा येथे तलाठीनोकरीसाठी आरंभ केलाव दोन वर्षांनी वाटार येथे बदली झाली.

## सत्यशोधक चळवळीचे कार्य :

कोल्हापूरचे शाहू महाराज यांच्या प्रेरणेने सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रभर विकशित झाली. सामान्य माणसांचा भट भिमुक्षाकडुन शोषणाचा छळ या सत्यशोधक चळवळीच्या कार्यामुळे थांबला . नाना पाटील हे बालपणात बंडखोर वृतीचे होते. समाजातील भेद व अन्याय त्यांना सहन होत नव्हते. म्हणून त्यांनी सत्यशोधक चळवळीत भाग घेतला. आणि क्रांतीकारी कार्याला सूरूवात केली.ते उत्कृष्ठ प्रचारक व संघटक होते. रान उठविणारा नेता म्हणुन ते सुव्यवस्थित होते. त्यांचे वकृत्व चांगले होते. समाजातील ऐतखाऊंच्या वर्गावर त्यांनी कडाडुन टिका केली. छ. शाहू महाराज व राष्ट्रपिता फुले ही त्यांची दोन दैवते होती.

## विवाह :

त्यांनी स्वतःच मंगलाष्टका गाऊन विवाह करून घेतला. ब्राम्हणाच्या विधीचा विरोध केला. जो पर्यंत माझ्या बायकोला लिहिता वाचता येत नाही तो पर्यंत तिच्याशी बायको म्हणून संबध ठेवणार नाही असे आपल्या आजीला सांगितले. नाना असे खरेखुरे सत्यशोधक होते. समाजसुधारणेचे त्यांचे विचार अतिशय व्यापक होते. त्यामध्ये स्त्रीशिक्षण, व्यसनमुक्ती, हुंडाबळी, जातिभेदनिवारण ,अस्पृश्यतानिवारण, दृष्ट चळवळी, परंपरा, रूढी, सावकारशाही व वतनदार शाही पदधतीला विरोध केला. तसेचसामाजिक अन्यायाचा प्रतिकार म्हणून ब्राम्हणशाहीला विरोध होता.

## राष्ट्रीय चळवळ :

सत्यशोधकवादी चळवळ राष्ट्रवादी चळवळ करण्याचे कार्य नाना पाटील यांनी केले. नोकरीचे कार्य असतानाच राष्ट्रीय चळवळ प्रस्थापित केली. वाटार येथे काशीनाथ देशमुखांना नाना म्हणाले शेटजी जरा वेतान बोला बरं का तुमच्या विरोधी काही लिहुन पाठविण्याचा वेळ तलाठी व सरकारी नोकर म्हणून माझ्यावर आणू नका.

मात्र सभा संपल्यावर नाना पाटील यांनी छ.शिवाजी महाराज की जय अशी घोषणा देवून स्वातंत्र्य चळवळीविषयी आत्मीयता प्रकट केली.तसेचसभा संपल्यावर काशीनाथ देशमुखांना आपल्या घरी चहापाणी करून स्वातंत्र चळवळ संबधी चर्चा विनिमय केला.

## नोकरीतून मुक्तता ः-

सरकारी नोकराने कॉंग्रेसशी जवळीक साधावी. हा सरकारच्या दृष्टीने मोठा गुन्हा होता. म्हणून त्यांना नोकरीतून कमी केले. देश कार्यासाठी त्यांनीनोकरीबरोबर संसाराच्या पाशापासूनही मुक्त होण्याचे ठरविले आणि देशकार्य हाच आपला संसार असे त्यांनी मानले.

## कायदेभंगाच्या चळवळीतील जनजागृती -

१९३० मध्ये कॉंग्रेसने म.गांधीच्या नेतृत्वाखाली कायदेभंगाची चळवळ सुरू केली.नाना पाटील या चळवळीत सहभागी होऊन जनजागृतीचे कार्य केले.

## पोशाख -

अंगावर जाडया भरडया खादीचा सदरा, कमरेला तसाच खादीचा सदरा, डोक्याला गांधी टोपी व काठीला लावलेला झेंडा घेऊन ते गावांत प्रवेश करीत व म.गांधी की जय, छ.शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देऊन आज चावडीसमोर नाना पाटलाची सभा आहे. सर्वांनी ऐकायला यावे अशा गावभर दवंडी दिली जायची. त्याचे सहकारी जी.डी.लाड यांनी म्हटले आहे की, “ते पैलवानी खाक्यात छडू मारून घोषणा देत. इंग्रज पोलीस कायदा यांना आव्हान करण्याची प्रेरणा उसळायची. त्यांच्या छड्डूतून वीरवृत्ती जागवली जात होती .

सर्व पश्चिम महाराष्ट्राची अस्मिता जागृत करण्याचे नाना पाटलांचे कार्य ब्रिटीश सरकारला सहन झाले नाही. नाना ना तुरूंगात डांबण्यासाठी, स्थानबद्ध करण्यासाठी व पकडण्यासाठी र पकड वॉरंट काढले. पण त्यांनी शिवाजी महाराज्याच्या गनिमी काव्याचे धडे गिरवले होते. त्यांनी ठरविले होते की पोलीसाच्या हाती न लागता आपले कार्य चालूच ठेवायचे. यांच्यामते सरकारी यंत्रणेच्या दहशतीला शह देण्याचा व गनीमी काव्याने लढण्याचा तोच एक प्रभावी उपाय वाटत होता.

## निर्भयतेचे शिक्षण -

नाना इंग्रजांना भीत नाही. मग आपणच का भ्यावे असे तरूणांना वाटू लागले व स्वातंत्र्याच्या रणसंग्रामात देशभक्तीचे धडे त्यांनी तरूणांना दिले. शिवरायांच्या आदर्शाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न त्यांनी तरूणांच्या मनावर ठसविला.

## पोलीसाच्या डोळया देखत यशस्वी पलायन -

मला फरारी जीवनाचा कंटाळा आला आहे. माझी ही शेवटची सभा आहे. मी सभा संपल्यावर स्वत:ला अटक करून घेणार. सभा दोन तास चालली होती. मध्येच शंभर दोनशे उभे राहून नाना पाटील की जय. अशी घोषणा उभे राहून दिली व घोळक्यातून नाना घोडयावर बसून पसार झाले.

पलूस मधील सभेत वत्ती घालवून अंधाराचे सहाय्य घेऊन पोलीससमोर नाना पसार झाले.एकदा तर चक्क तिरडीवर झोपूनच नाना पोलीससमोर पसार झाले.अशाप्रकारे पोलीसांच्या डोळयादेखत अनेकवेळा पसार झाले.

## पहिला कारावास -

५ मार्च १९३१ रोजी कॉंग्रेसने चळवळ स्थगित केल्याने नाना स्वत:च पोलीसाकडे हजर झाले.सरकारने त्यांच्यावर रीतसर खटला भरला. ९ महिने कारावास झाला.चलेजाव १९४२ चे आंदोलन होईपर्यंत ते तब्बल ८ वेळा तुरूंगातून जाऊन आले होते.

## कॉंग्रेसच्या पदाधिका याकडून अवमान -

आमच्याकडे आर्थिक मदतीची आशा बाळगू नका.सहभागी व्हा असं आम्ही निमंत्रण देण्यासाठी आम्ही तुमच्या पर्यंत आलो नाही. असे कॉंग्रेसचे पदाधिकारी आर्थिक मदतीच्यावेळी बोलले. त्यावेळी यातना, दुःख नानाला खूप झाले.

त्यांनी हमाली करून पैसे मिळवायचे ठरविले. तेव्हा तेथील हमाल नानाला ओळखून त्यांना पोत्याला हात लावू देईनात आम्ही वर्गणी काढून तुम्हाला पैसे गोळा करून देऊ. पण तुमच्यासारख्या मोठया माणसाला आम्ही पोत्याला हात लावू देणार नाही असे म्हणून हमालांनी त्यांना मान दिला व आर्थिक मदतही केली. पण कॉंग्रेसच्या पदाधिका यांकडून नानाचा अवमान केला गेला.

## हमालाच्या मदतीला नकार -

तुमच्या कष्टाचे पैसे मी कसे घेऊ मला ते जमणार नाही. असे सांगितले.कपडे फाटली होती. म्हणून नानानी बाजारपेठेतून एक गोणपाट पैदा केला. त्या गोणपाटलाच एक सदरा व पॅंट शिवली. गोणपाटाचे कपडे अंगावर घालून ते देशासाठी पोते बुवा बनले.

## चले जाव चळवळीतील सहभाग -

१९४२ च्या चलेजाव अथवा छोडो भारत या चळवळीत नानाचे योगदान इतके महत्वपूर्ण होते की, नाना पाटील हे नाव एकदम राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहचले. त्यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकारला तर सर्व भागात व्यापक प्रसिध्दी मिळाली.सर्व राष्ट्र प्रेमी जनता त्याच्याकडे कौतुक भरल्या नजरेने या अभिनव प्रयोगाकडे पाहू लागली.

८ ऑगस्ट १९४२ रोजी चलेजाव अथवा छोडो भारतचा ठराव संमत झाला व आंदोलकांनी घोषणाबाजी केली. दुस याच दिवशी आंदोलनाच्या प्रमुखांना तुरंगात टाकले. या सरकारच्या कृतीला उत्तर म्हणून भारतीय जनतेनं योग्य वाटेल त्या दिशेने हे आंदोलन चालूच ठेवले. साता याच्या जिल्हयातील जनतेने हया आंदोलनाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. नाना पाटलाच्या नेतृत्वाखाली निघालेला तासगावचा मोर्चा कमालीचा यशस्वी ठरला. त्यांनी तिरंगा कचेरीवर फडकविला आणि मामलेदारास गांधी टोपी परिधान करण्यास भाग पाडले.या मोर्च्यात १० हजार लोक सहभागी होते.

## भूमिगत चळवळीचा निर्णय -

जनसमुदायाच्या पातळीवर नान पाटील हे भूमिगत चळवळीचे प्रतिक बनले. त्याच्या कार्यामुळे व स्वातंत्रय चळवळीच्या राष्ट्रीय कार्यामूळे नानाचे नाव घरोघरी पोहचले. भूमिगत चळवळ ही त्यांच्याच नावानेच ओळखली जात होती.ही चळवळ कार्यकर्त्यांना प्रेरणास्थान बनली. नाना पोलीसाच्या हाती कधीही सापडू नयेत. अशी चोख व्यवस्था या चळवळीने करण्यात आली.घातपाताच्या कृत्यातही ती यशस्वी ठरली.

## प्रतिसरकारची स्थापना -

सरकारी यंत्रणेला प्रतिस्पर्धी अशी आपली स्वत:ची चळवळ उभी करणे. हे एकमेव ध्येय समोर ठेवून देशात इतरत्र काय चालले हे न पाहता आपण आता अशाठिकाणी पोहोचलो आहोत की मागे फिरण्याचा मार्ग बंद झाला आहे. इंग्रजाच्या हातून मरण्यापेक्षा लढत लढत मरूया अशी खंबीर भूमिका नानानी घेतली आणि सातारच्या प्रतिसरकारची स्थापना केली. ते केवळ प्रतिसरकारचे नेते नव्हते तर त्याचे निर्माते व प्रेरक शक्तीही होते. सामान्य जनतेच्या दृष्टीने तर प्रतिसरकार म्हणजे नाना पाटील असेच समीकरण रूढ झाले होते.

## तुफान सेना -

प्रतिसरकारच्या सैनिक संघटनासाठी तुफान सेनेची निर्मिती करण्यात आली.या सेनेचे फिल्ड मार्शल म्हणून नाना पाटलांनी जी.डी.लाड याची नियुक्ती केली. त्यानी कुंडल येथे प्रशिक्षण तरूणांना देणेचे कार्य सुरू केले.

## पगाराची आगगाडी लुटली -

७ जून १९४३ रोजी विचूद व शेणोली या स्टेशनच्या मध्यावर असलेल्या खिंडीत क्रांतीकारकानी ही गाडी अडवली आणि पैसे घेऊन पसार झाले. नंदूरबार हून धुळयाला मोटारीने नेत असलेला साडेपाच लाखाचा खजिना असाच लुटला. अशाप्रकारे लुट करून प्रतिसरकार आर्थिकदृष्टया सक्षम केले.

## पत्रीचा अभिनव प्रयोग-

ग्रामीण भागात सरकारी अधिकारी वतनदार व गावगुंड यांच्याकडून सामान्य लोकांना अतिशय उपद्रव होत होता. प्रतिसरकार ला जनतेची मान्यता मिळावी म्हणून गावातील पाटलाला मध्यरात्री क्रांतीकारकांनी गावाबाहेर नेऊन त्याला उताने पाडून दोन्ही पाय दोरखंडानी करकचून बांधले जाऊन दोन्ही पाय वर उचलून त्याच्या तळपायावर काठीने सपासप पंधरावीस तडाखे हाणले जाई. या प्रकारालाच पत्री लागणे असे नाव पडले. या प्रकारे ठिकठिकाणी गावगुंड व सरकारी हस्तक यांना पत्र्या लावल्या. या आक्रमक पावित्र्यामुळे सरकारी हस्तक व समाजकंटक यांची चांगलीच दमछाक झाली.

## भूमीगत अवस्थेमधील काही अनुभव -

कुंडल या गावी पडक्या घरात कुलुप लावून आतुन लपून बसले असता एक नाग त्याला बघून पसार झाला.पारेगावी सदाशिव पवार यांच्या घरी मुक्काम करीत. पण सदाशिव पवारच्या वडीलांना हे माहित नव्हते. इतके गोपनीय त्यांचे मुक्काम होते. त्यांच्या सामाजिक कामामुळेच प्रतिसरकार हे गोरगरीब जनतेला आपले वाटू लागले.

## प्रतिसरकारची कामगीरी -

सावकारांना पकडून त्याची धिंड गावभर काढीत.असे अभियान प्रती सरकारने सुरू केले. त्यामुळे बाकीचे सावकार घावरून गेले.ही घटना या सातारच्या जिल्हयातून प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून झाली व त्याचाकडील सर्व कागदपत्रे, कर्जरोखेही काढून घेतले. त्यामुळे इतर गावामध्ये सावकार घाबरून जावू लागले.

## गावोगावी न्यायमंडळे स्थापन -

गावची भांडणे व बाद मिटविण्यासाठी गावोगावी न्याय मंडळे स्थापून लोकांना न्याय देणेचे काम सुरू केले. खोटया साक्षी, लबाडी बनवाबनवी या बाबी गावाच्या समोर उघड होऊन लोकांना न्याय मिळवून दिला. सरकारी न्यायापेक्षा प्रतिसरकारकडे जलद योग्य न्याय मिळतो. अशी भावना जनतेत रूढ झाली.अशाप्रकारे १९४६ पर्यंत नानाचे प्रतिसरकारच कार्यरत होते. ७ मे १९४६ रोजी भूमिगत अवस्थेचा त्याग करून कराड येथील कोणेगांव येथे ते प्रकट झाले.

## कामगार पक्षाची स्थापना -

### स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेसने भांडवलदार व जमीनदा यांच्या रक्षणांना प्राधान्य -

भारतात गोरगरीब जनता, शेतकरी, कामगार यांचे राज्य स्थापन व्हावे.असेनाना स्वप्न बाळगत होते.पण त्या विरोधी कॉंग्रेसचे धोरण राहील्याने नानांनी कॉंग्रेसचा त्याग केला व शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

## कम्युनिष्ट पक्षात प्रवेश -

श्रमजीवी जनतेचे राजकारण पुढे रेटण्याचे सामर्थ्य फक्त कम्युनिष्ट पक्षात असल्याचे वाटल्याने १९५३ मध्ये त्यांनी कम्युनिष्ट पक्षात प्रवेश केला.असे अनेक पक्ष नानांनी बदलले.पण ध्येयनिष्ठा बदलली नाही. शेतकरी कामगारांचे राज्य यावे हे त्यांचे अंतिम स्टेशन होते.

## १९५४ रोजी किसान सभेचे अध्यक्ष -

रशियाप्रमाणे शेतकरी कामगाराचे राज्य भारतात स्थापन करता येते. असा विश्वास त्यांना वाटत होता.

## संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान-

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांवर त्यांनी रान उठवले. मोरारजी देसाईच्या पोलीसांनी चालविलेल्या अत्याचार संबंधी ग्रामीण जनतेला जागृत केले. त्यांच्या या प्रचार कार्यामुळे १६ जाने १९५६ रोजी त्यांना अटक करून नाशिक च्या मध्यवर्ती कारागृहात ९ महिने ठेवण्यात आले.

## लोकसभेवर निवड -

१९५७ च्या निवडणूकीत नाना पाटलांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रचाराची भूमिका समर्थपणे मांडली.शा या महाराष्ट्राभर नानांनी झंझावती दौरा काढून हजारोंच्या सभा त्यांनी घेतल्या. मुंबईसह महाराष्ट्र राज्य आपण मिळविले. यात नाना पाटलांचा मोठा भाग आहे. हे महाराष्ट्राला कळाले.

भूमिहीन शेतमजूरासाठीही लढा त्यांनी दिला. १९६० साली पुन्हा नाना पाटील बीड मतदारसंघातून लोकसभेवर दुस यांदा निवडून गेले व शेतकरी कामगार यांचे सक्षम नतृत्व लोकसभेत केले.

## समारोप -

महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जडघडणीत नाना पाटलांचे महत्वपूर्ण संघर्षमय योगदान होते. खासदार होऊनहीत्यांनी गोरगरीबांचे चटणी - भाकर हीच जन्माची साक्षीदार मानली. वारशा दिवशीच पंढरीची माळ गळयात पडल्याने मद्य व मासांहार यांचा संबंध आला नाही. १९७१ नंतर मधुमेहाचा आजार वाढत गेला.६ डिसेंबर १९७६ रोजी अखंड धगधगणारा ज्वालामुखी अनंतात शांत झाला.

## संदर्भ ग्रंथ

१.क्रांतिसिंह नाना पाटील, प्रा.विलास पाटील, लोकवांड्मय ग्रह मुंबई

२.स्वातंत्र्याचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्य अभ्यास निर्मिती मंडळ पुणे.